# नगर परिषद उमरेड

(जिल्हा - नागपूर)

अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

ई-मेल nagarparishadumred@gmail.com

दूरध्वनी क्र. 07116-243100

क्रमांक- एमनीप /अग्नी/1143/२०२३

दिनांक - 29/08/2023

प्रति,

संस्कार विद्या सागर,
भाऊसाहेब मुळक चॅरीटेबल ट्रस्ट उमरेड
जि.नागपूर

**विषय : अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

संदर्भ : १) आपला अर्ज दि. २८/०२/२०२३ रोजीचे.

२) मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन संचालनालय ,महाराष्ट्र शासन मुंबई यांच्याकडून प्राप्त नोंदणीकृत लायसन्स धारक अमेया एजेन्सी, छत्रपती नगर , नागपूर License No.MFS-LA/2023/RF-254/RD-510/RP/41 दि.25/08/2023 यांनी सादर केलेल्या 'A' Form व ऑडीट अहवाल

प्रमाणित करण्यात येते कि.मे संस्कार विद्या सागर, भाऊसाहेब मुळक चॅरीटेबल ट्रस्ट उमरेड जि.नागपूर यांनी संदर्भ १ चे विनंती अर्जानुसार व संदर्भ २ चे महाराष्ट्र अग्निशमन सेवा मुंबई यांचे प्राधिकृत अभिकर्ता/संस्थेद्वारे अग्निसुरक्षा ऑडीट करून शाळेकरिता या व्यवसायासाठी अग्निशमन विभाग नगरपरिषद उमरेड यांचे अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्राची मागणी केली आहे. त्यानुसार खालील नियम व अटी शर्तींच्या आधीन राहून आपणांस ना हरकत प्रदान करण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये आपणास आगप्रतिबंधक उपाययोजना व यंत्रणा यामधील तरतुदींचे अनुपालन करण्यात यावे व NBC -२०१६ नियमांची पूर्तता करण्यात यावी तसेच राज्य शासन व उमरेड नगरपरिषदेने वेळोवेळी केलेले नियम व त्यामधील बदल आपल्यावर बंधनकारक राहील.

२) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्निसुरक्षा व्यवस्था करावी लागेल. पाण्याची टाकी नेहमीच पूर्ण भरलेली असावी. आवश्यक त्या ठिकाणी धुम्रपान निषेध फलक लावावे व महत्वाचे दूरध्वनी क्रमांक उदा.पोलीस नियंत्रण कक्ष ,अग्निशमन दल, अँम्बुलन्स ई.चा फलक दर्शनीय ठिकाणी लावावे.

३) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले लायसन्स धारक यांच्या कडून जानेवारी व जुलै असे वर्षातून दोन वेळा करून घेणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

४) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी प्रशिक्षण देऊन माहिती देण्यात यावे तसेच मॉक ड्रिल घेण्यात यावा.

५) आगप्रतिबंधक उपाययोजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी सर्व विद्युत उपकरणे खात्रीच्या अभिकर्त्याकडून तपासून घ्यावेत.

६) इमारतीमध्ये मध्ये लावण्यात आलेले Fire Extinguisher दरवर्षी रिफिलिंग करण्यात यावे. तसेच प्रत्येक महिन्यात सर्व अग्निशमन उपकरण चालू स्थितीत आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेत त्रुटी आढल्यास तत्काळ दुरुस्ती करण्यात यावे.

७) आगप्रतिबंधक उपाययोजना बाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमन दल मार्फत केव्हाही करता येईल. अग्निशमन प्रमाणपत्र सोबत इतर विभागाचे आवश्यक ते परवाने घ्यावेत.

८) ना हरकत प्रमाणपत्राची वैधता १ वर्षाची राहील.

९) वरील प्रमाणे व्यवस्थे अभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

१०) दरवर्षी नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

११) सदर अधिनियमाच्या किंवा त्यासाठी केलेल्या नियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या उल्लंघनाच्या या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या तरतुदीन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाची किंवा नोटीसीच्या किंवा निर्देशाच्या आवश्यकतेनुसार अनुपालन करण्यात कसूर केल्यास संबंधित प्रकरणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२) वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले ना हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१३) मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन संचालनालय ,महाराष्ट्र शासन मुंबई यांच्याकडून प्राप्त नोंदणीकृत लायसन्स धारक अमेया एजेन्सी, छत्रपती नगर , नागपूर License No.MFS-LA/2023/RF-254/RD-510/RP/41 दि.25/08/2023 यांनी सादर केलेल्या 'A' Form व ऑडीट अहवाल ला अनुसरून अग्निशमन सुरक्षा [redacted] प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणपत्र हे १ वर्ष पर्यंत वैध राहील.

टीप : १) अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्राचे नुतनीकरण दरवर्षी करणे अनिवार्य आहे.

२) शासन नियमानुसार फार्म बी दर सहा महिन्याने सादर करणे अनिवार्य आहे.

Ann 29 Aug 23

मुख्याधिकारी
नगर परिषद, उमरेड

2023/8/29 18:43

Scanned with CamScanner